भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ३२)

[५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# Hindu Minority and Guardianship Act, 1956

(Act No. 32 of 1956)

[As in force on the 5th December 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९३

[किंमत : रुपये २.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक १, दिनांक ७ जानेवारी १९९२, यात पृष्ठ ७२ ते ७५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ७ जानेवारी १९९२

**व्ही. एस. रमादेवी,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Hindu Minority and Guardianship Act, 1956 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 72 to 75.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 7th January 1992.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

एच ४३११ (१०३४—११-९३)

# हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. हा अधिनियम १८९० चा अधिनियम ८ याला पूरक असणे.

३. (क) अधिनियम लागू करणे.

४. व्याख्या.

५. अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

६. हिंदू अज्ञान व्यक्तीचे नैसर्गिक पालक.

७. दत्तक पुत्राचे नैसर्गिक पालकत्व.

८. नैसर्गिक पालकाच्या शक्ती.

९. मृत्युपत्रीय पालक व त्यांच्या शक्ती.

१०. संपत्तीचा पालक म्हणून कार्य करण्याची अज्ञान व्यक्तीची अक्षमता.

११. वास्तविक पालकाने अज्ञानाच्या संपत्तीबाबत व्यवहार करावयाचा नाही.

१२. एकत्र कुटुंबाच्या संपत्तीतील अज्ञान व्यक्तीच्या अविभक्त हितसंबंधासाठी पालक नियुक्त करावयाचा नाही.

१३. अज्ञान व्यक्तीचे कल्याण ही सर्वाधिक विचारार्ह बाब असणे.

# हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६

## (१९५६ चा अधिनियम क्रमांक ३२)[१]

[ २५ ऑगस्ट १९५६ ]

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान)

**हिंदूमधील अज्ञानत्व व पालकत्व यासंबंधीच्या कायद्याचे विवक्षित भाग विशोधित व संहिताबद्ध करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास "हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे. आणि ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांमध्ये अधिवासी असलेले जे हिंदू उक्त राज्यक्षेत्राबाहेर असतील त्यांनाही तो लागू आहे.

हा अधिनियम १८९० चा अधिनियम ८ याला पूरक असणे.

२. या अधिनियमाचे उपबंध "पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०" (१८९० चा ८) यास पूरक असतील व यात यापुढे व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही त्यास न्यूनकारी असणार नाहीत.

अधिनियम लागू करणे.

३. (१) हा अधिनियम पुढील व्यक्तींना लागू आहे :—

(क) जी व्यक्ती धर्माने, त्याचे कोणतेही रूप किंवा विकसन यांनुसार हिंदू आहे अशी कोणतीही व्यक्ती वीरशैव, लिंगायत अथवा ब्रम्हो समाजाचा, प्रार्थना समाजाचा किंवा आर्य समाजाचा अनुयायी यांसुद्धा ;

(ख) जी व्यक्ती धर्माने बौद्ध, जैन किंवा शीख आहे अशी कोणतीही व्यक्ती; आणि

(ग) ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यामध्ये अधिवासी असलेली जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी किंवा ज्यू नाही अशी अन्य कोणतीही व्यक्ती—मात्र हा अधिनियम पारित झाला नसता तर यात परामर्श घेण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधीची हिंदू कायद्याने अथवा त्या कायद्याचा भाग असलेल्या कोणत्याही रुढीने किंवा परिपाठाने नियंत्रित झाली नसती असे सिद्ध करण्यात आले तर गोष्ट अलाहिदा.

**स्पष्टीकरण.**—पुढील व्यक्ती धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा प्रकरणपरत्वे, शीख आहेत :—

(एक) ज्याच्या मातापित्यांपैकी दोघेही धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहेत असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य ;

(दोन) ज्याच्या मातापित्यांपैकी एकजण धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहे आणि अशी माता वा पिता ज्या जनजातीतील, समाजातील, समूहातील किंवा कुलातील आहे किंवा होता त्याचा घटक म्हणून ज्याचे पालनपोषण करण्यात आले आहे असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य; आणि

(तीन) जी व्यक्ती धर्मांतर किंवा पुनर्धर्मांतर करून हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख धर्मात आलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट संविधानाचा अनुच्छेद ३६६ याचा खंड (२५) याच्या अर्थानुसार कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या घटक व्यक्तींना लागू असणार नाही.

[२][(२क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पाँडिचेरी या संघराज्यक्षेत्राच्या रेनोकान्स्टना लागू असणार नाही.]

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही भागातील "हिंदू" या शब्दप्रयोगात जी व्यक्ती धर्माने हिंदू नसली तरीही या कलमात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या आधारे जिला हा अधिनियम लागू होतो अशी जी व्यक्ती आहे त्या व्यक्तीचा त्यात जणू काही समावेश असावा, अशा तऱ्हेने या शब्दप्रयोगाचा अर्थ लावला जाईल.

---

१. हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६, कलम २ आणि अनुसूची १ ली यांद्वारे दादरा व नगर हवेलीला आणि "पाँडिचेरी (कायद्यांचे विस्तारण) अधिनियम, १९६८" (१९६८ चा २६) कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे पाँडिचेरीला लागू करण्यात आला आहे.

२. पाँडिचेरीला हा अधिनियम लागू करताना, १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व, अनुसूची यांद्वारे पोटकलम (२) नंतर हे पोटकलम घातले आहे.

व्याख्या.

४. या अधिनियमात—

(क) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत ती व्यक्ती असा आहे ;

(ख) "पालक" याचा अर्थ, ज्याच्याकडे अज्ञानाच्या देहाची किंवा त्याच्या संपत्तीची किंवा त्याचा देह व संपत्ती या दोहोंची देखभाल असेल अशी व्यक्ती असा आहे, आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश आहे :—

(एक) नैसर्गिक पालक;

(दोन) अज्ञानाच्या पित्याच्या किंवा मातेच्या मृत्युपत्राद्वारे नियुक्त झालेला पालक;

(तीन) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला पालक; आणि

(चार) त्या नात्याने कार्य करण्यात कोणत्याही पाल्याधिकारणाशी संबंधित अशा कोणत्याही अधिनियमितीद्वारे किंवा त्या खाली शक्ती प्रदान झालेली व्यक्ती ;

(ग) "नैसर्गिक पालक" याचा अर्थ कलम ६ मध्ये उल्लेखिलेल्यापैकी कोणताही पालक असा आहे.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

५. या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही,—

(क) हिंदू कायद्याचे कोणतेही वचन, नियम किंवा निर्वचन अथवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्या कायद्याचा भाग म्हणून अंमलात असलेली कोणतीही रूढी किंवा परिपाठ या अधिनियमात जिच्याकरता उपबंध केलेला आहे अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात परिणामक असण्याचे बंद होईल ;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्यापैकी कोणत्याही उपबंधांशी तो जेथवर विसंगत असेल तेथवर परिणामक असण्याचे बंद होईल.

हिंदू अज्ञान व्यक्तीचे नैसर्गिक पालक.

६. हिंदू अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात तसेच (एकत्र कुटुंबाच्या संपत्तीतील त्याचा किंवा तिचा अविभक्त हितसंबंध वगळून) अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीसंबंधात अज्ञान व्यक्तीचे नैसर्गिक पालक पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) मुलगा किंवा अविवाहित मुलगी यांच्या बाबतीत पिता व त्याच्या पश्चात माता, परंतु ज्याच्या वयाला पाच वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशा अज्ञान मुलाची अभिरक्षा सामान्यतः मातेकडे असेल ;

(ख) अनौरस मुलगा किंवा अनौरस अविवाहित मुलगी यांच्या बाबतीत माता व तिच्या पश्चात पिता ;

(ग) विवाहित मुलीच्या बाबतीत—पती परंतु कोणतीही व्यक्ती—

(घ) जर ती हिंदू राहिली नसेल तर, किंवा

(ङ) जर तिने वानप्रस्थ अथवा यती किंवा संन्यासी बनून संपूर्णपणे व कायमचा प्रपंचाचा त्याग केलेला असेल तर,

या कलमाच्या उपबंधांखाली अज्ञान व्यक्तीचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, "पिता" व "माता" या शब्दप्रयोगांत सावत्र पिता व सावत्र माता, यांचा समावेश नाही.

दत्तक पुत्राचे नैसर्गिक पालकत्व.

७. जो अज्ञान आहे अशा दत्तक पुत्राचे नैसर्गिक पालकत्व दत्तविधानानंतर दत्तकग्राही पित्याकडे व त्याच्या पश्चात दत्तकग्राही मातेकडे जाते.

नैसर्गिक पालकाच्या शक्ती.

८. (१) हिंदू अज्ञान व्यक्तीच्या नैसर्गिक पालकाला, या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, अज्ञान व्यक्तीच्या लाभासाठी अथवा अज्ञान व्यक्तीची संपदा हस्तगत करणे, तिचे संरक्षण करणे किंवा लाभ करून देणे यासाठी जरूर किंवा योग्य व उचित असतील त्या सर्व कृती करण्याची शक्ती असेल; पण काही झाले तरी, पालक अज्ञान व्यक्तीस व्यक्तिगत प्रसंविदेने बद्ध करू शकत नाही.

(२) नैसर्गिक पालक, न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय—

(क) अज्ञान व्यक्तीच्या स्थावर संपत्तीचा कोणताही भाग गहाण टाकणार नाही अथवा त्यावर प्रभार ठेवणार नाही अथवा विक्री, दान, विनिमय याद्वारे किंवा अन्यथा हस्तांतरित करणार नाही, किंवा

(ख) अशा संपत्तीचा कोणताही भाग पाच वर्षांपेक्षा अधिक मुदतीकरता किंवा ज्या दिनांकास अज्ञान व्यक्तीला सज्ञानता प्राप्त होणार त्याच्या पलिकडे एक वर्षाहून अधिक अशा मुदतीकरता भाडेपट्ट्याने देणार नाही.

(३) नैसर्गिक पालकाने उपखंड (१) किंवा उपखंड (२) यांचे व्यतिक्रमण करून केलेली कोणतीही स्थावर संपत्तीची विल्हेवाट अज्ञान व्यक्तीच्या किंवा त्याच्या पोटी दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून शून्यकरणीय असते.

(४) गरजेचा प्रसंग किंवा अज्ञानाचा उघड फायदा असेल ती बाब खेरीजकरून, एरव्ही, नैसर्गिक पालकाला कोणतेही न्यायालय उपखंड (२) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही कृती करण्यास परवानगी देणार नाही.

(५) 'पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०' (१८९० चा ८) हा, पोटकलम (२) खाली न्यायालयाची परवानगी मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाला व त्याच्या संबंधात, तो जणू काही त्या अधिनियमाच्या कलम २९ खाली न्यायालयाची परवानगी मिळवण्यासाठी केलेला अर्ज असावा अशा प्रकारे सर्व बाबतीत लागू असेल व विशेषत: —

(क) त्या अर्जासंबंधीची कार्यवाही त्या अधिनियमाच्या कलम ४क च्या अर्थानुसार त्या अधिनियमाखालील कार्यवाही असल्याचे मानले जाईल;

(ख) त्या अधिनियमाच्या कलम ३१ ची पोटकलमे (२), (३) व (४) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रक्रिया न्यायालय अनुसरील व त्याला त्यात विनिर्दिष्ट केलेल्या शक्ती असतील; आणि

(ग) या कलमाच्या पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही कृती करण्यास नैसर्गिक पालकाला परवानगी नाकारणाऱ्या न्यायालयाच्या आदेशावर, ज्याच्याकडे त्या न्यायालयाच्या निर्णयावर सामान्यत: अपिले होऊ शकतात त्या न्यायालयाकडे अपील होऊ शकेल.

(६) या कलमात "न्यायालय" याचा अर्थ, जिच्या संबंधात अर्ज करण्यात आला आहे ती स्थावर संपत्ती ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत असेल ते नगर दिवाणी न्यायालय किंवा जिल्हा न्यायालय किंवा पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० (१८९० चा ८) याच्या कलम ४क खाली शक्ती प्रदान करण्यात आलेले न्यायालय असा आहे, आणि स्थावर संपत्ती अशा एकाहून अधिक न्यायालयांच्या अधिकारितेत असेल त्याबाबतीत, त्याचा अर्थ ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत त्या संपत्तीचा कोणताही अंश असेल ते न्यायालय असा आहे.

**मृत्युपत्रीय पालक व त्यांच्या शक्ती.**

९. (१) स्वत:च्या अज्ञान औरस अपत्यांचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असलेल्या हिंदू पित्याला त्यांच्यापैकी कोणाहीसाठी मृत्युपत्राद्वारे अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात किंवा अज्ञान व्यक्तीच्या (कलम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अविभक्त हितसंबंधाहून अन्य) संपत्तीसंबंधात किंवा दोहोंच्या संबंधात पालकाची नियुक्ती करता येईल.

(२) जर पिता मातेच्या आधी मृत्यू पावला तर, पोटकलम (१) खाली करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही प्रकारे परिणामक होणार नाही, पण माता मृत्युपत्राद्वारे कोणत्याही व्यक्तीची पालक म्हणून नियुक्ती न करताच मृत्यू पावल्यास ती नियुक्ती पुनरुज्जीवित होईल.

(३) स्वत:च्या अज्ञान औरस अपत्यांचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असलेल्या हिंदू विधवेला आणि स्वत:च्या अज्ञान औरस अपत्यांचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास पिता हक्कवंचित झाला आहे या वस्तुस्थितीच्या कारणास्तव त्या नात्याने कार्य करण्यास हक्कदार झालेल्या हिंदू मातेला त्यांच्यापैकी कोणाहीसाठी मृत्युपत्राद्वारे अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात किंवा अज्ञान व्यक्तीच्या (कलम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अविभक्त हितसंबंधाहून अन्य) संपत्तीसंबंधात किंवा दोहोंच्या संबंधात पालकाची नियुक्ती करता येईल.

(४) स्वत:च्या अज्ञान अनौरस अपत्यांचा नैसर्गिक पालक म्हणून कार्य करण्यास हक्कदार असलेल्या हिंदू मातेला त्यांच्यापैकी कोणाहीसाठी मृत्युपत्राद्वारे अज्ञान व्यक्तीच्या देहासंबंधात किंवा अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीसंबंधात किंवा दोहोंच्या संबंधात पालकाची नियुक्ती करता येईल.

(५) अशा प्रकारे मृत्युपत्राद्वारे नियुक्त झालेल्या पालकाला अज्ञान व्यक्तीचा, पिता किंवा प्रकरणपरत्वे माता मृत्यु पावल्यानंतर अज्ञान व्यक्तीचा पालक म्हणून कार्य करण्याचा आणि, या अधिनियमात व मृत्युपत्रात जर काही विनिर्दिष्ट केले असेल तर तेवढ्या व्याप्तीपुरते व तशा निर्बंधांच्या अधीनतेने, या अधिनियमाखालील नैसर्गिक पालकाचे सर्व अधिकार वापरण्याचा अधिकार आहे.

(६) अशा प्रकारे मृत्युपत्राद्वारे नियुक्त झालेल्या पालकाचा अधिकार, जर अज्ञान व्यक्ती मुलगी असेल तर तिचा विवाह होताच समाप्त होईल.

**संपत्तीचा पालक म्हणून कार्य करण्याची अज्ञान व्यक्तीची अक्षमता**

१०. अज्ञान व्यक्ती कोणत्याही अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीचा पालक म्हणून कार्य करण्यास अक्षम असेल.

बास्तविक पालकाने अज्ञानाच्या संपत्ती-बाबत व्यवहार करावयाचा नाही.

११. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, कोणतीही व्यक्ती, तो किंवा ती केवळ एखाद्या हिंदू अज्ञान व्यक्तीचा वास्तविक पालक आहे एवढयाच कारणावरून अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीची विल्हेवाट करण्यास किंवा तिच्याबाबत व्यवहार करण्यास हक्कदार असणार नाही.

एकत्र कुटुंबाच्या संपत्तीतील अज्ञान व्यक्तीच्या अविभक्त हितसंबंधासाठी पालक नियुक्त करावयाचा नाही.

१२. जर अज्ञान व्यक्तीचा एकत्र कुटुंबाच्या संपत्तीत अविभक्त हितसंबंध असेल आणि ती संपत्ती कुटुंबातील सज्ञान सदस्यांच्या व्यवस्थापनाखाली असेल तर, अज्ञान व्यक्तीसाठी अशा अविभक्त हितसंबंधा-बाबत कोणताही पालक नियुक्त केला जाणार नाही :

परंतु या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशा हितसंबंधाबाबत पालकाची नियुक्ती करण्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकारितेवर परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

अज्ञान व्यक्तीचे कल्याण ही सर्वाधिक विचारार्ह बाब असणे.

१३. (१) न्यायालयाकडून कोणतीही व्यक्ती एखाद्या हिंदू अज्ञान व्यक्तीचा पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित केली जात असता, अज्ञान व्यक्तीचे कल्याण ही सर्वाधिक विचारार्ह बाब असेल.

(२) कोणतीही व्यक्ती, जर न्यायालयाच्या मते त्याचे किंवा तिचे पालकत्व अज्ञान व्यक्तीस कल्याणप्रद होणार असेल तर, या अधिनियमात किंवा कोणत्याही कायद्यात हिंदूमधील विवाहार्थ पालकत्वासंबंधी जे उपबंध असतील त्यांच्या आधारे पालकत्वास हक्कदार होणार नाही.